07 JUL 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आजऱ्याचा सामाजिक, सांस्कृतिक लढा शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

## 'एका लोकलढ्याची यशोगाथा' पुस्तकाचा विद्यार्थी करणार अभ्यास

**आजरा : कृष्णा सावंत**

आजरा तालुक्यातील चित्री, उचंगीसह विविध सामाजिक व सांस्कृतिक लढ्यांचे विश्लेषण करणारे कॉ. संपत देसाई लिखित 'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे पुस्तक यावर्षीपासून शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे. त्यामुळे आजऱ्यातील सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचा अभ्यास कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यांतील ३५० महाविद्यालयांतील विद्यार्थी करणार आहेत.

श्रमिक मुक्ती दलाचे कार्याध्यक्ष देसाई यांची रस्त्यावरचा लढाऊ कार्यकर्ता म्हणून ओळख आहे. 'एका लोकलढ्याची यशोगाथा' पुस्तकामुळे आजरा परिसरातील कष्टकऱ्यांचा




लढा विद्यापीठीय पातळीवर अभ्यासाला जाणार आहे.

सर्वार्थाने फाटकी असलेली माणसे नैतिकता आणि आत्मविश्वासाच्या बळावर शासनासारख्या शक्तिमान, बलाढ्य व्यवस्थेला कशी नामोहरम करू शकतात, न्याय्य मागण्यांसाठी संविधानाच्या चौकटीत राहून सूत्रबद्ध आणि रचनात्मक संघर्ष कसा उभा करू शकतात, याचे संयत दर्शन या पुस्तकातून घडते. आपली बाजू न्याय्य असेल, तर अशावेळी परस्पर विश्वासने आणि लोकशाही मार्गाने लढा कसा उभारावा आणि तो कसा यशस्वी करावा, हे या पुस्तकात उलगडले आहे. लोकांच्या प्रश्नावर मोठे लढे होतात आणि नोंदीअभावी काळाच्या उदरात ते गायब होतात. परिसराच्या स्थानिक संस्कृतीबद्दलही हे पुस्तक बोलते. आजरा परिसरातील रूढी, परंपरा, प्रथा, समाजजीवन, व्यक्तींची स्वभाव वैशिष्ट्ये, येथील निसर्गही पुस्तकातून भेटतो. येथील माणसांचे निसर्गाशी असलेले अतूट नाते, अभावग्रस्त जगणे याबद्दलची आस्था या लेखनात आहे.

'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांचे 'अशी मने, असे नमुने' या पुस्तकानंतर आजऱ्यातील हे दुसरे पुस्तक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या अभ्यासक्रमात लागले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUL 2024
पुढारी



हणबरवाडी : येथे आयोजित कार्यक्रमात वृक्षारोपण करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आदी.

# भावी पिढीसाठी झाडे लावणे, जगवणे महत्त्वाचे : कुलसचिव डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** पुढील पिढीच्या चांगल्या भवितव्यासाठी झाडे लावणे व जगवणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊन्सचे न्यू कॉलेजच्या ग्रीन क्लब, एनसीसी, भूगोल व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हणबरवाडी येथे वृक्षारोपण करण्यात आले. डॉ. शिंदे यांनी झाडांचे महत्त्व व त्यांची उपयुक्तता स्पष्ट केली. भावी पिढ्यांच्या आरोग्यासाठी झाडांचे महत्त्व सांगितले. संचालक प्रा. विनय पाटील यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. डॉ. मनीषा नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रबंधक एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते.